दैनिक
जनसामान्यांचा आवाज
RNI No. MAHMAR/2017/49039
# गुहागर सत्ता
गुहागर, चिपळूण, मुंबई येथे उपलब्ध
संपादक : राजेंद्र मांडवकर
◆ वर्ष ७ ◆ अंक १२९१ ◆ बुधवार दि. २१ सप्टेंबर २०२२ ◆ पृष्ठे ४ ◆
मुल्य रु. ३/-

## रत्नागिरी जिल्हा परिषदेवर धडकल्या हजारो अंगणवाडी सेविका

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनी आज आपल्या न्याय हक्क मागण्यासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेवर मोर्चा काढला. अंगणवाडी कर्मचारी सभा (महाराष्ट्र) च्या रत्नागिरी जिल्हा अध्यक्षा संज्योक्ती सुरेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, संगमेश्वर, रत्नागिरी, लांजा, राजापूर तालुक्यातील हजारो अंगणवाडी सेविका जिल्हा परिषदेवर धडकल्या. यावेळी अंगणवाडी सेविकांनी आपल्या मागण्यांचे निवेदन प्रशासनाकडे सादर केले.

महाराष्ट्र राज्य पुरोगामी राज्य म्हणून नावाजले जाते, पण महिलांचा सन्मान म्हणून सुमारे 2 लाख 8 हजार अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडे शासनाने तातडीने लक्ष घालावे अशी मोर्चाद्वारे मागणी करण्यात आली. या मागण्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने अंगणवाडी कर्मचा यांना शासकीय कर्मचारी मानून वेतनश्रेणी, भत्ते देणेची शिफारस केली आहे. म्हणून अंतरीम वाढ म्हणून तातडीने 12000 रुपये मानधन वाढ मिळावी. राज्यात सुमारे 4500 अंगणवाडी कर्मचा यांना निवृत्तीवेतन सेवासमाप्तीनंतर मिळालेले नाही.




## शिवसेना पक्षप्रमुख यांच्याबाबत रामदास कदम ह्यांनी काढलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा शिवसेना रत्नागिरी तालुक्याच्या वतीने निषेध

शिवसेना पक्षप्रमुख मा.उध्दव ठाकरे ह्यांच्या बाबत रामदास कदम ह्यांनी काढलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा रत्नागिरीत शिवसेना रत्नागिरी तालुक्याच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख विलासजी चाळके ह्यांच्या नेतृत्वाखाली तालुकाप्रमुख प्रदीप उर्फ बंड्या साळवी व विधानसभा क्षेत्रप्रमुख प्रमोद शेंरे ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत आठवडा बाजार येथे प्रतिमेचे दहन करून निषेध करण्यात आला.

# दापोलीत सेना-शिंदे गट आमनेसामने

**दाभोळ :** दापोली येथे झालेल्या शिंदे गटाच्या मेळाव्यात माजी पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी ठाकरे कुटुंबीयांबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्यामुळे दापोलीत शिवसेनेचे कार्यकर्ते संतप्त झाले. वक्तव्याचा निषेध करण्यासाठी मंगळवारी (ता.२०) शिवसेना कार्यकर्ते एकत्र आल्याचे समजताच शिंदे गटाचे कार्यकर्तेही तिथे आल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी वेळेवर घटनास्थळी येऊन दोन्ही गटांना बाजूला केले. दोन्ही गटांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली; परंतु पोलिसांनी दोन्ही गटांशी चर्चा केल्यानंतर कार्यकर्ते शांत झाले; मात्र पोलिसांनी शिवसेना शाखेसह आमदार कदमांच्या कार्यालयाबाहेरही पोलिस बंदोबस्त ठेवला आहे.

दापोलीतील सभेत रामदास कदम यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केले. त्यामुळे शिवसेनेचे कार्यकर्ते संतप्त झाले आहेत. त्याचा निषेध करण्यासाठी दापोली येथील शिवसेना शहर शाखेत ठाकरे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मंगळवारी सायंकाळी जमले होते. शाखेबाहेर असलेल्या रस्त्यावर ठाकरे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते रामदास कदम यांचा निषेध करणारे बॅनर व प्रतीकात्मक पुतळा घेऊन आले व त्यांनी रामदास कदम यांच्या विरोधात घोषणा देण्यास सुरवात केली. ही माहिती मिळताच शिंदे गटाचे कार्यकर्ते शिवसेना शहर शाखेच्या बाहेर जमले; मात्र तेवढ्यात



पोलिसही तिथे आले. दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये रामदास कदम व आमदार भास्कर जाधव यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. त्यामुळे वातावरण तंग झाले. पोलिसांनी कार्यकर्त्यांकडून पुतळा ताब्यात घेतला.

पोलिसांनी प्रसंगावधान राखून ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना शिवसेना शहर शाखेत पाठवले, तर शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना बाहेरच थांबवले. ठाकरे गटाचे कार्यकर्ते शाखेत जात असताना शिंदे गटाचे कार्यकर्ते शाखेत घुसले. याच गडबडीत शाखेच्या मागील बाजूस असलेल्या खिडकीची काच कोणीतरी फोडली. त्यामुळे वातावरण आणखी चिघळले. शाखेत शिरण्यास ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी विरोध केला. पोलिसांनी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना बाहेर काढले. तेवढ्यात उपविभागीय पोलिस अधिकारी शशिकिरण काशीद घटनास्थळी आले. त्यांनी दोन्ही गटांच्या पाच जणांना पोलिस ठाण्यात येण्याची विनंती केली. तेव्हा शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी शाखा आमच्या नावावर आहे, ती बंद करा व सर्वांना बाहेर काढा, अशी मागणी केली. त्यानंतर दोन्ही गटाचे पदाधिकारी पोलिस ठाण्यात गेले. तिथे उपविभागीय अधिकारी काशीद यांच्या उपस्थितीत दोन्ही गटांमध्ये चर्चा झाली; मात्र या सर्व प्रकारामुळे दापोलीत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांशी झालेल्या चर्चेत शिवसेनेचे सूर्यकांत दळवी, तालुकाध्यक्ष ऋषिकेश गुजर, नरेंद्र करमरकर, किशोर देसाई, तर शिंदे गटाचे प्रदीप सुर्वे, प्रसाद रेळेकर, उन्मेष राजे, रोहिणी दळवी, प्रीती शिर्के, राजेंद्र फणसे आदी उपस्थित होते. 'असा प्रकार पुन्हा होणार नाही, असे दोन्ही गटांनी सांगितले आहे; मात्र खबरदारीचा उपाय म्हणून शिवसेना शहर कार्यालय व आमदार योगेश कदम यांचे कार्यालय येथे पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**- शशिकीरण काशीद, उपविभागीय पोलिस अधिकारी, खेड विभाग**

**गुन्हे दाखल करण्याची तंबी**

पोलिस ठाण्यात आल्यावरही उपविभागीय पोलिस अधिकारी काशीद यांच्यासमोर दोन्ही गटाचे नेते आवाज चढवून बोलत होते. तेव्हा तेथे उपस्थित असलेल्या खेडच्या पोलिस निरीक्षक निशा जाधव यांनी तुम्ही प्रथम वर्ग अधिकाऱ्यांसमोर आवाज चढवून बोलत असल्याने तुमच्यावर गुन्हे दाखल केले जातील, अशी तंबी दिल्यावर दोन्ही गटांचे नेते शांत बसले. त्यांनी सामंजस्याची भूमिका घेतली व तणाव निवळला.

# श्रृंगारतळी –गुहागर मार्गावर मोकाट गुरांचा रास्ता रोको

## बसण्याचे हक्काचे ठिकाण मात्र, वाहनचालकांना त्रास, अपघातप्रवण क्षेत्र

**गुहागर/प्रतिनिधी :** शृंगारतळी –गुहागर मार्गावरील पाटपन्हाळे येथील इंग्लिश मीडियम स्कूलच्या समोर अलिकडे मोकाट गुरांनी ठिय्या मांडलेला दिसून येत आहे. जणू काही त्यांचे येथील बसण्याचे हक्काचे ठिकाण असून सर्व एकत्र गुरे येथे ठाण मांडून असतात. मात्र, याचा त्रास वाहनचालकांना होत असून हा भाग अपघात प्रवण क्षेत्र बनले आहे.


पाटपन्हाळे इंग्लिश मीडियम समोरील रस्त्यावर ठाण मांडून बसलेली गुरे.

गुहागर तालुक्याची आर्थिक राजधानी असलेल्या शृंगारतळी बाजारपेठेत मोकाट गुरांचा प्रश्न उभा ठाकला आहे. स्थानिक प्रशासनानेही यावर अनेक उपाययोजना राबविल्या मात्र, ते सपशेल अयशस्वी ठरलेल्या आहेत. कोंडवाडे, गुरे मालकांना दंड असे उपायही करुन पाहिले मात्र, दिवसेंदिवस मोकाट गुरांचा उपद्रव सुरुच आहे. नोटीसा बजावूनही गुरे मालक दाद देत नाहीत. शृंगारतळी-गुहागर हा नेहमीचा वर्दळीचा मार्ग आहे. भरधाव वाहने ये-जा करत असतात. अशावेळी दाटीवाटीने रस्त्यावर ठाण मांडून बसलेली मोकाट गुरे दिसून येतात. कधी कधी वृत्तपान 3 वर..

# वरवेलीतील क्षितिज शिंदेंच्या हळद लागवडीला तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी अवश्य भेट द्या- गट विकास अधिकारी प्रशांत राऊत

## पं.स.गुहागरचा नाविन्यपूर्ण उपक्रम

**दै. गुहागर सत्ता (प्रतिनिधी) :** पंचायत समिती हळद लागवडीचा नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत वरवेली येथील क्षितिज शिंदे यांच्या हळद लागवडीच्या प्लॉटला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रशांत राऊत यांनी आवर्जून भेट दिली. व खूप मेहनतीने या हळद प्लॉटची काळजी घेऊन उपाययोजना केल्याबद्दल शिंदे कुटुंबियांचं कौतुक केले.

क्षितिज शिंदे व श्वेता शिंदे यांनी पंचायत समितीकडून हळद लागवडीबाबत प्रशिक्षण घेतले. यापूर्वीही सचिन कारेकर यांच्या गारवा कृषी पर्यटन केंद्र आबलोली येथेही प्रशिक्षण घेतले होते.

शिंदे यांनी मुकनाक रोपवाटिका निगुंडळ येथून ७५० रोपे आणली. १४ जूनला SK-4या वाणाच्या रोपांची शिंदे यांनी लागवड केली. जून महिन्यात पाऊस थोडा उशीराच सुरू झाला. पण आम्हाला प्रशिक्षणात माहिती दिल्या प्रमाणे १५जुनपूर्वी लागवड करणे आवश्यक होते.१४जूनला लागवड केल्यानंतर मात्र ४-५ दिवस आम्ही रोपांना पाणी शिंपले. लागवड करताना कृषी अधिकारी



*हळदीच्या मोठ्या गड्डयाला बक्षीस*

*पंचायत समिती गुहागर च्या वतीने हळद लागवडीचा नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत SK-४ हळद लागवड केलेल्या शेतकऱ्यांना सर्वात मोठ्या हळदीच्या गड्डयासाठी बक्षीस जाहीर करण्यात आले.*

*प्रथम क्रमांक -रू.२५००/-, दुसरा क्रमांक -रू.१५००/-व तिसरा क्रमांक -१०००/- याच बरोबर स्मृती चिन्हही देण्यात येईल. त्यामुळे या उपक्रमात भाग*

*घेतलेल्या शेतकऱ्यांनी हळदीचा सर्वात मोठा खड्डा उत्पादन करण्यासाठी प्रयत्न करावेत., असे आवाहन कृषी विस्तार अधिकारी गजेंद्र पौनीकर यांनी केले.*

आर. के. धायगुडे व कृषी विस्तार अधिकारी गजेंद्र पौनीकर यांनी वेळोवेळी केलेल्या सर्व सुचना आम्ही तंतोतंत पाळल्या. लागवडीचा वेळी शेणखत, गांडूळ खत, निमपावडर, सुफला, बायोपावर, क्लोरोपायरीफॉस पावडर इत्यादींचा सूचनेनुसार वापर केला. रोपे जोडओळ पद्धतीने लावली.,दोन जोड रांगांमध्ये ५ फूट व दोन रोपांमध्ये १फुट



असे अंतर ठेवले. दोन वेळा गवत काढलं. रोपांची वाढ योग्य पद्धतीने झाल्यावर गणपती पुर्वी आणखी गांडूळ खत व सुफला यांची मात्रा दिली.मध्यंतरी कृषी विस्तार अधिकारी यांच्या भेटी दरम्यान पाने गुंडाळणारी अळी दिसून आली. व तीन चार पानांवर करपासदृष्य रोग दिसून आला.म्हणून उपाययोजना व पुढे किड रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून काळजीपूर्वक कलोरोपायरीफाॅस २०मिली व कार्बन डायझीम १० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी केली. त्यामुळे किड नाहीसी झाली.व बुरशीचाही प्रादुर्भाव दिसला नाही.

शिंदे यांनी त्यांचे अनुभव यावेळी सांगितले.वेळीच मातीची भर दिल्यामुळे जवळपास सर्वच ठिकाणी ३ फुटवे आहेतच मात्र काही ठिकाणी ४-५ तर काही ठिकाणी ६फुटवे आहेत. पानांची लांबी देखील ३५-४० सेमी व रूंदी १५-२० सेमी आहे. अजूनही जिवामृतच्या दोन मात्रा व १९:१९:१९ पाण्यात विरघळणा-या खतांच्या २मात्रा शिल्लक आहे. एकंदरीत आमच्या वृत्तपान 3 वर..

# संपादकीय...

## "भारत" विश्व शांतीचे “उगमस्थान” व “आधारस्तंभ”

जगात भारताला शांतीचे "प्रतीक" मानल्या जाते.विश्र्वशांतीची सुरूवात भारतानेच केली आणि पुढेही "विश्र्व शांतीची जोत" भारताकडून अशीच "प्रज्वलित" राहील.आज जगात शांती कशी प्रस्थापीत करता येईल याकडे भारताचे संपूर्ण लक्ष आहे.भारत हा देवी-देवता,ऋषि-मुनी,साधु-संत,ज्ञानी,थोर महात्म्ये, क्रांतिकारक यांच्या प्रयत्नाने बनलेला देश आहे.त्यामुळे जगात शांतता कशी प्रस्थापीत करता येईल याचा अभ्यास करण्याकरिता संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे नेहमीच असते.कारण जगाच्या पाठीवर भारताचा उगम शांतता प्रस्थापित करण्यासाठीच झाला असावा.त्यामुळे गंगा,कावेरी, गोदावरी, नर्मदा, यमुना, वैनगंगा,तापी, कृष्णा इत्यादी नद्या सुध्दा शांतीचे द्योतक मानलै जाते.भारताने नेहमी शांततेचा पुरस्कार केला आहे."गौतम बुध्दासारख्या महाज्ञानी" यांनी भारतात शांतीची जोत प्रज्वलीत केली व संपूर्ण जगभर फीरवीली."मर्यादा पुरूषोत्तम राम" यांनी सुध्दा शांततेचा पाठ संपूर्ण जगाला शिकवणीला व इस्लामिक धर्मगुरू "महम्मद पैगंबर" यांनी सुध्दा विश्र्व शांती करीता मोठे अभियान छेडले होते त्याचप्रमाणे "शिख गुरू गुरूनानक देवजी" यांनीही शांती प्रस्थापित करण्यासाठी मोलाची कामगिरी केली.पुर्वी आणि आताही विश्वात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत अग्रेसर होता आणि आहे.यात तिळमात्र शंका नाही.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.चीनने जगात अशांतीचे वातावरण निर्माण करून वेळोवेळी"तिसऱ्या महायुद्धाची आहाट" ऐकु येत आहे.जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत संपूर्ण ताकद लावीत आहे तर चीन शांती भंग करण्याच्या तयारीत आहे.परंतु भारताचे काम शांततेने होत नसेल तर भारतही "उग्ररूप" धारण करून चीनला पटकनी देवु शकते.मानवाचा जन्म शांतता प्रस्थापित करण्यासाठी व जिवसृष्टीचे संरक्षण करण्यासाठी झाला आहे.परंतु चीन कुत्ते, मांजर,चामगाधड,पाल,साप,जे भेटेल ते खातात त्यामुळे आज चीनची बुध्दी कुत्र्यासारखी झाली आहे.त्यामुळे चीनने जर शांती भंग केली तर "कुत्ते की मौत मारा जायेगा" ही बाब चीनने लक्षात ठेवली पाहिजे.कारण वेळ पडल्यास तैवान चीनला सूध्दा भारी पड़ु शक्तो. जगात आतंकवाद दिवसेंदिवस वाढत होता यामुळे जगातील संपूर्ण देशात भीतीचे वातावरण निर्माण होवून शांती भंग होत होती.शेवटी संपूर्ण जगाला शपथ घ्यावी लागली की जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी आतंकवाद्यांचा खात्मा होणे गरजेचे आहे.त्या पध्दतीने प्रत्येक देशांनी आतंकवाद्यांविरूध्द कारवाईला सुरूवात केली.कारण प्रत्येक देश आतंकवाद्यांच्या कारवाईने त्रस्त होते.परंतु संपूर्ण विश्र्वाला वाटायला लागले की आतंकवाद्यांचा नायनाट केल्याशिवाय जगात शांतता प्रस्थापित होवुच शक्त नाही.त्या अनुषंगाने आज प्रत्येक देश शांततेसाठी आतंकवाद्यांचा खात्मा करण्यास दृढ "संकल्प" असल्याचे दिसून येते.परंतु चीनने जगात "करोणा संक्रमन"पसरवून लाखो लोकांचा जीव घेतला व करोडो लोकांचा जीव धोक्यात टाकला आणि विस्तारवादी नियतीचा अवलंब करून हिटलर प्रमाणे जगावर राज करण्याची स्वप्ने शि.जिनपिंग पहात आहे.चीनचे धोरण आहे की शेजारी राष्ट्रांची जमिन हडप करून सुपर पावर बनण्याची स्वप्ने पाहत आहे.सध्याच्या परिस्थितीत भारत-चीनची सेना आमने-सामने आहेत.तरीही भारताने शांतीचा मार्ग अजुनही सोडलेला नाही.चीन शांतता हा शब्द समजत नसेल तर त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय सेना नेहमीच सज्ज असते.सध्याच्या परीस्थितीत चिनच्या विस्तारवादी नितीमुळे विश्र्व शांती भंग होण्याच्या मार्गावर आहे.चीन-तैवान संघर्ष लक्षात घेता चायना सी मध्ये चीनला टक्कर देण्यासाठी अमेरिकेसह नाटो सेना सज्ज झाली आहे त्याचबरोबर जापान व ऑस्ट्रेलियाने सूध्दा कंबर कसली आहे.म्हणजेच सध्याच्या परिस्थितीत जगातील शांती भंग करण्याचे काम चीन करीत आहे.याचे प्रायचीत्य संपूर्ण जगाला भोगावे लागु शक्ते.जगात शांती प्रस्थापित व्हायची असेल तर चीनला त्याची जागा दाखवावीच लागेल.चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे संपूर्ण जगात "अशांतीचे वातावरण"निर्माण झाले आहे.जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी अनेक धर्माचे,जातीचे,पंथाचे व अनेक भाषा बोलणारे लोक रहातात.भारताने नेहमीच शांतीचा पुरस्कार केला आहे.परंतु भारताशेजारी गद्दारांची फौज उभी ठाकली आहे.एकीकडे पाकिस्तानचा आतंकवाद व दुसरीकडे चीनची विस्तारवादी नीती यामुळे भारताने सुध्दा जशास तसे उत्तर देण्याचे ठाणले आहे.भारत नेहमी शेजारी राष्ट्रांसोबत शांती बहाल करण्याच्या प्रयत्नात असतो.परंतु भारताचा जीवलग मित्र समजल्या जाणाऱ्या नेपाळनेसुध्दा चीनचे पाय चाटण्याचे काम करीत असतो व भारताच्या पाठीत खंजर खुपसण्याचे काम करतो.अशाप्रकारे भारता शेजारचे संपूर्ण राष्ट्रांना चीन आर्थिक मदत करून आपला कब्जा करून सैन्य सामुग्री व एअरबेस तयार करण्याच्या तयारीत आहे.चीनने वुहान मधुन करोणा व्हायरस पसरवून मानवजातीचा विश्र्वास घात करून मृत्यूच्या खाईत लोटन्याचे काम केले आहे.याचे प्रायचीत्य चीनला भोगावेच लागेल.आज विश्र्व शांति टिकवून ठेवण्यासाठी अती लोकसंख्या असलेल्या देशांनी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.जगाच्या पाठीवर लोकसंख्येच्या बाबतीत चीन नंतर भारताचा नंबर लागतो.परंतु भारताच्या भुभागाचा विचार केला तर जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर असल्याचे दिसून येते.त्यामुळे भारताला शांती प्रस्थापित करण्याकरिता एक पाऊल पुढे टाकून"हम दो हमारा एक"ही मोहीम राबवुन लोकसंख्या नियंत्रणात आणाली पाहिजे.आज चीनी चांडालच्या घृनीत कृत्यामुळे व युध्द सामुग्रीच्या चढाओढीमुळे प्रत्येक देश अनेक द्वीधेमध्ये असल्याचे दिसून येते.या द्वीधेपासुन मुक्ती मिळवायची असेल तर प्रत्येक देशांनी अनुचाचण्या, घातक हतीयार, मिसाईल परीक्षण व करोणासारखे व्हायरस तयार करने इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.तेव्हाच विश्र्वात शांती प्रस्थापित होवु शक्ते.याला नाकारता येत नाही.आज संपूर्ण जगाला ग्यात आहे की विश्वामध्ये शांति प्रस्थापित करायची असेल तर भारताचा सहयोग अती आवश्यक आहे.त्यामुळेच आज संपूर्ण जग चीनच्या विरोधात भारतासोबत उभा आहे.त्यामुळे चीनने लक्षात ठेवले पाहिजे की युध्द हे कोणत्याही प्रकारचे समाधान राहुच शक्त नाही.विश्र्वशांतीच्या बाबतीत भारत काय आहे हे विश्र्वाला "महात्मा गांधींनी" दाखवून दिले आणि आज 130 कोटी भारतीयांच्या छत्रछायेच्या माध्यमातून भारत विश्र्व शांतीचा मसिहा बनल्याचे दिसून येते.कारण प्रत्येक देशाला शांतीची गरज आहे.जगाच्या पाठीवर भारताने अनेक उतार-चढाव पाहीले आहेत.यातुनच शांतीचा उगम झाल्याचे दिसून येते.भारताची संस्कृतीच शांतता प्रस्थापित करण्यासाठी झाली आहे.त्रेतायुग व्दापरयुग,सत्ययुग आणि कलयुगात सुध्दा भारतीय संस्कृतीने संपूर्ण जगाला शांततेची शिकवण दिली आहे.भारत भुमित महाभारत, रामायण इत्यादी ज्या घटना घडल्या त्या सर्व विश्र्व शांती करीता होत्या ही बाब संपूर्ण जगाने लक्षात ठेवली पाहिजे.भारतातुन जगात जो ही संदेश जातो तो विश्र्व शांती करीता असतो.भारताने पाकिस्तानला शांततेसाठी हजारो वेळा समजविले.परंतु त्यांच्या नसानसात व रक्तात क्रूरता स्पष्ट दीसुन आली.त्यामुळेच पाकिस्तानात आतंवाद उफाळलेला आहे व तो स्वतः रक्ताच्या लाथोळ्यात अडकल्याचे दिसून येते.त्यामुळेच पाकिस्तानपासुन इस्लामीक देशांसह इतर देश अलग-थलग पडल्याचे दिसून येते.विश्व शांती म्हणजे मानसिक सुख नसुन वन्यप्राणी,जीव-जंतु,जंगल संपदा, निसर्गाचे संतुलन, पृथ्वीचे संरक्षण या संपूर्ण बाबींवर योग्य नियंत्रण ठेवुन त्यांची जोपासना केली तर विश्वामध्ये आपोआप शांती नांदायला सुरूवात होईल."विश्र्व हेची माझे घर"ही भुमिका जगातील प्रत्येक देशांनी व व्यक्तीने जोपासली पाहिजे.आज संपूर्ण जग प्रदुषणामुळे, अनेक आजारामुळे,युध्दजन्य परीस्थितीमुळे जगातील प्रत्येक व्यक्ती त्रस्त आहे.याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे.विश्वामध्ये शांती प्रस्थापित करण्यामागे भारताचा "सर्वधर्मसमभाव" हा मुलमंत्र सार्थक ठरत आहे.कारण भारतात हिंदू, मुस्लिम,शिख,ईसाई, बौद्ध,फारसी,ख्रिश्चन इत्यादी अनेक धर्माचा व देवी-देवतांचा वास नेहमी नांदत असतो.त्यामुळे विश्र्व शांतीच्या गंगेचा उगम भारतातुन झाल्याचे दिसून येते.या लेखाच्या माध्यमातून मी हेच सांगु इच्छितो की 21 सप्टेंबरला जगातील प्रत्येक व्यक्तीने शांतता प्रस्थापिकरण्यासाठी "संकल्प" करावा.जगातील देशांना मी आग्रह करेल की "विस्तारवादी"नीतीचा खात्मा करून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.कारण विस्तारवादी नीती संपूर्ण जगाला "घातक" आहे.जगात भारताला विश्वशांतीचे उगमस्थान, दुत, आधारस्तंभ अशा अनेक उपमा दिल्या आहेत.याची जानीव चीनने ठेवली पाहिजे.करोना काळापासून संपूर्ण जग "नमस्कार" करायला लागले आहे हे सुद्धा भारतीय संस्कृतीचे शांतीचे "प्रतीक" आहे.सध्याच्या परिस्थितीत गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेले युक्रेन -रशिया युद्ध आणि चीन-तैवानचा वाढता संघर्ष टोकाला पोहोचले आहे.याला शांत करण्यासाठी भारताने उझबेकिस्तान येथील समरकंद येथे आयोजित करण्यात आलेल्या 22 व्या "शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या"(एससीओ) परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रशियाला युक्रेन विरूद्ध युद्ध थांबविण्याचा सल्ला दिला.त्याचप्रमाणे एससीओ परिषदेत बोलताना सदस्य देशांना आव्हान केले की ही वेळ युध्दाची नसुन शांतता प्रस्थापित करण्याची आहे.म्हणजे भारत शांतता प्रस्थापित करण्यासाठी अग्रेसर आहे हे भारताने जगाला दाखवून दिले आहे. जगाला यशाकडे वाटचाल करायची असेल तर "शांतीचा मार्ग"अवलंबावाच लागेल मग तो कोणताही देश असो.21 सप्टेंबर "विश्र्व शांती"दिवस लक्षात घेता जगातील प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी वृक्षारोपण करून शांतीचा संदेश संपूर्ण जगाला दिला पाहिजे.

**जय हिंद!**

**लेखक. रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.9921690779 नागपूर.

# एकलव्याचा कपटाने अंगठा कापला गेला, त्याच परिस्थितीला आजही आदिवासी बांधवांना सामोरे जावं लागतय;उत्तमराव खोब्रागडे

**(प्रवीण रा. रसाळ) :** "आदीकाळापासून मनुवादी व्यवस्थेने भिनवलेल्या जातीपातीच्या विषारी डंखाची तीव्रता अजूनही कमी झालेली नाही, तत्कालीन भिल्ल म्हणजेच आदिवासी समाजातील एकलव्याला शिक्षक, शाळा, शिकवणी किंवा कोणत्याही प्रकारची शैक्षणिक सुविधा नसताना ही केवळ परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने धनुर्विद्येत नैपुण्य प्राप्त केले परंतू कपटाने गुरुदक्षिणेच्या नावाखाली त्याचा अंगठाच कापून घेतला गेला; त्याच परिस्थितीला आजही आदिवासी बांधवांना सामोरे जावे लागत आहे, सरकारने कागदोपत्री आदिवासी बालविकास व कल्याणाच्या नावाखाली आदिवासी आश्रमशाळांकरता अनेकविध योजना राबविल्या असल्या तरी मी नागपूर येथे पदभार सांभाळला असता केलेल्या सर्व्हे मध्ये माझ्या निदर्शनास आलं की आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना एकवेळचे जेवण ही भेटत नाही, विद्यार्थ्यांना शौच व स्नानगृह या आवश्यक गरजाही न पुरवल्याने आदिवासी मुला-मुलींना उघड्यावरच सर्व विधी करावे लागत आहे, म्हणजेच कागदोपत्री असलेला निधी लुबाडला जातोय हे लक्षात आल्याने मी एका दिवसात आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय घेतला आणि आदिवासी बांधवांना न्याय देण्यासाठी लढा उभा केला तेव्हा आपल्याच अधिकाऱ्यांनी माझ्या पाठीत खंजीर खुपसून माझी बदली केली, बंधूंनो ज्याच्या बापाला परदेशात उच्चशिक्षणासाठी बाबासाहेबांनी पाठवलं त्यानेच आंबेडकर भवन पाडलं, तुम्ही जर IAS अधिकारी झालात तर आंबेडकर भवन पाडण्यासाठी होऊ नका तर ते नव्याने बांधण्यासाठी व्हा, आणि सर्वसामान्य नागरिकांना घटनेचा माध्यमातून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील रहा, आज तुम्ही गुणवंत




यादीत आलात म्हणून समाजाने तुमचा सन्मान केलाय तेव्हा समाजाचे तुम्ही देणे लागता हे विसरू नका" असे प्रतिपादन उत्तमराव खोब्रागडे (IAS अधिकारी) यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान समारंभात केले.

बौद्धजन पंचायत समिती संलग्न शिक्षण समिती यांच्या विद्यमाने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह येथे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला होता, सदर कार्यक्रमास उत्तमराव खोब्रागडे व त्यांच्या सुविद्य पत्नी मंदाताई खोब्रागडे उपस्थित होत्या, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धजन पंचायत समितीचे सरचिटणीस राजेश घाडगे यांनी केले तर प्रास्ताविक शिक्षण समितीच्या राजेश पवार यांनी केले, सदर कार्यक्रमास उपसभापती विनोदजी मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मणजी भगत, माजी कार्याध्यक्ष किशोरजी मोरे, उपकार्याध्यक्ष अशोक कांबळे, एच.आर.पवार, मनोहर मोरे, कोषाध्यक्ष नागसेन गमरे, संस्कार समिती अध्यक्ष मंगेश पवार, रमेश जाधव, साहित्य कला-क्रीडा समिती अध्यक्ष राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे तसेच व्यवस्थापन मंडळ, उपसमित्यांचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते, जवळपास ३००-३५० माध्यमिक, उच्चमाध्यमिक, पदवी, पदविकाधर, विद्यावाचस्पती (डॉक्टरेट) या गुणवंत विद्यार्थ्यांना या ठिकाणी सन्मानित करण्यात आले. त्यासोबतच क्रीडा क्षेत्रातून भारतीय कॅरम संघात स्थानप्राप्त झालेली निलम भीमराव घोडके जी ३० ऑक्टोबर रोजी मलेशिया येथे भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे, त्यासोबतच सुवर्ण पदक विजेते भारतीय ऋषीराज रवींद्र कदम (वेट लिफ्टिंग), दिशा दीपक तांबे (नॅशनल हॉकी), तनिष तांबे (किक बॉक्सिंग), भूमी अरविंद साळवी (रायफल शूटिंग), कार्तिकी किशोर साळवी (राज्यस्तरीय कराटे) यांचा ही सन्मान करण्यात आला.

सदर प्रसंगी अध्यक्षीय भाषणात "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते मी माझ्या बछड्यांना पाजतोय, ही पिल्लं पुढे जाऊन अन्याय, अत्याचाराचा निकराने विरोध करतील, बाबासाहेबांचा हाच वैचारिक वारसा पुढे नेत ही नवीन पिढी उदयास येत आहे, त्याकाळी शिक्षणाचा अधिकार नसल्याने बाबासाहेबांनाही शाळे बाहेर उभं राहून शिक्षण घ्यावं लागलं, क्रांतिवीर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी सर्वांसाठी उपलब्ध केलेल्या शिक्षणव्यवस्थेचा पाया घातला तर त्यावर कळस बाबासाहेबांनी चढवला म्हणूनच आज आपण इथवर आलो आहोत, आपण सर्वांनी आपापल्या क्षेत्रात भरारी घेऊन समाज कार्यात आपले योगदान द्यावे" असे प्रतिपादन अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी अध्यक्षीय भाषणात केले.

सदर कार्यक्रमास पालक, पाल्य व सर्वच स्तरातील जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता, शिक्षण समितीने नियोजित पद्धतीने कार्यक्रमाची आखणी करून तो यशस्वीरीत्या संपन्न केला त्यासाठी राजेश पवार तसेच माजी अध्यक्ष तुळशीराम शिर्के व सर्वच पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले, त्या सर्वांचे सरतेशेवटी अशोक मोहिते यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

# गुहागर तालुका कुणबी पतसस्थेची 21 वी सर्वसाधारण वार्षीक सभा उत्साहात संपन्न

**स्वर्गीय रामभाऊ बेंडल , डि.बी.घाणेकर यांच्या स्वप्नातील आर्थीक सक्षम कुणबी समाजासाठी कटीबध्द - रामचंद्र हुमणे**

**आबलोली (संदेश कदम)** : आमचे श्रद्धास्थान माजी आमदार, स्वर्गीय रामभाऊ बेंडल यांनी गुहागर तालुक्यात शृंगारतळी येथे मेनरोड लगत कुणबी समाजासाठी, कुणबी समाजाच्या उन्नतीसाठी संत तुकाराम ग्राहक वस्तू भाडार आणि कुणबी समाजोन्नती संघ ऊभा केला आज शृंगारतळी येथे गुहागर बाजार, कुणबी पतसंस्थेची शृंगारतळी शाखा आणि माजी आमदार ,स्वर्गीय रामभाऊ बेंडल सभागृह अशी भव्य ईमारत ऊभी आहे तसेच खोडदे गावचे सुपूत्र कै. डि.बी.घाणेकर यांच्या स्वप्नातील आबलोली येथील ग्राहक वस्तू भांडार हि जागा खरेदी करुन याठिकाणी गुहागर तालुका कुणबी नागरी सहकारी पतसंस्था लिमीटेड आबलोली या पतसंस्थेची भव्य ईमारत आपल्या समाजाच्या मालकीची असून हेदवी येथेही पतसंस्थेची शाखा कार्यरत असून कुणबी समाजात आर्थीक उन्नतीचे काम पारदर्शकपणे सुरु असून स्वर्गीय रामभाऊ बेंडल, कै. डि.बी.घाणेकर, कै. सदाशिव आदवडे, कै. यशवंत पागडे, कै. महादेव निवाते, कै. गजानन बेंडल, कै. काशिनाथ डिंगणकर, कै. सखाराम गोरिवले , कै. कृष्णा निकम, कै. डि. एस. हुमणे, कै. तानाजी ठोंबरे, यांच्या स्वप्नातील आर्थीक सक्षम कुणबी समाज घडवीण्यासाठी कटीबध्द होऊया असे जाहिर आवाहन गुहागर तालुका कुणबी सहकारी पतसंस्था आबलोलीचे चेअरमन श्री. रामचंद्र हुमणे गुरूजी यांनी केले.

गुहागर तालुक्यातील आबलोली येथील कुणबी पतसंस्थेच्या प्रधान कार्यालयातील सभागृहात कुणबी पतसंस्थेची २१ वी सर्वसाधारण वार्षीक सभा श्री. रामचंद्र हुमणे गुरुजी यांचे अध्यक्षतेखाली उत्साहात आणि शांततेत संपन्न झाली. यावेळी व्हाईस चेअरमन श्री.तुकाराम निवाते यांनी उपस्थित महिला पुरुषांचे, संपर्क प्रमूखांचे शाब्दीक स्वागत केले त्यानंतर मान्यवरांचे हस्ते दिपप्ज्वलीत करून स्वर्गीय रामभाऊ बेडल यांच्या व लक्ष्मी मातेच्या प्रतिमांचे पूजन करुन प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले त्यानंतर अहवाल सालात जे- जे मान्यवर , सभासद आपल्यातून निघुन गेले त्या सर्वांना दोन मिनीटे स्तब्ध ऊभेराहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली नंतर मान्यवरांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला नंतर कार्यलक्षी संचालक श्री. अनिल घाणेकर यांनी २१ व्या सर्वसाधारण सभेच्या नोटीसचे वाचन केले यावेळी मार्गदर्शन करताना श्री.रामचंद्र हुमणे गुरुजी पुढे म्हणाले की , कुणबी पतसंस्थेचा पारदर्शक कारभार होत असून पतसंस्थेने कायम "अ" वर्गाची परंपरा राखली असून आता पर्यंत पतसंस्थेने १७ कोटी २५ लाख ठेवी ठेवल्या असून आतापर्यंत १० कोटी कर्ज वितरण केले आहे पतसंस्थेने सभासदांच्या हितासाठी नवनविन योजना राबविण्यात येत असून गृहतारण कर्ज योजनेसाठी ३ लाख रुपये कर्ज देण्याचे जाहिर करण्यात आले असून कार्यक्षम सभासदांनाच सर्व कागदपत्रांची पूर्ततः करणा-या आणि सक्षम जामिनदार देणा-या सभासदांना या योजनेचा लाभ १० वर्ष मुदतीने १२% व्याजदराने घेता येईल अशी माहिती श्री.रामचंद्र हुमणे गुरुजी यांनी दिली.

यावेळी व्हाईस चेअरमन श्री. तुकाराम निवाते यांनी कुणबी पतसंस्थेने सभासद महिला - बंधू भगिनींनी पतसंस्थेव्दारे कर्ज घेऊन त्याची वेळेत परतफेड करावी म्हणजे पतसंस्थेचा आणि आपला विश्वास सार्थ ठरेल असे सांगून सोने तारण कर्ज व विवीध कर्ज त्यावरील व्याजदर यांची मौलिक माहिती श्री. तुकाराम निवाते यांनी दिली त्यानंतर श्री. प्रदिप बेंडल, श्री. पांडूरंग पाते यांनीही मौलिक मार्गदर्शन केले

यावेळी व्यासपिठावर अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन श्री.रामचंद्र हुमणे गुरुजी, व्हाईस चेअरमन श्री. तुकाराम निवाते, माजी संचालक गणपत पाडावे, जेष्ठ संचालक पांडूरंग पाते, प्रदिप बेंडल, महादेव वणे, अनंत पागडे , वैभव आदवडे, अमोल वाघे, संदेश कदम, सौ. श्रावणी पागडे, श्रीमती. वनिता डिंगणकर, संदिप पाष्टे, उदय गोरीवले, अनिल घाणेकर, गंगाराम बोडेकर, अनिल हुमणे, प्रमोद गोणबरे ,अनिकेत पागडे, रमेश सोलकर, विजय मसूरकर, रविंद्र आग्रे, शांताराम पागडे, शिवराम निवाते, संदेश काजारे, दिपक भूवड, शंकर पागडे, तुकाराम पागडे, सरपंच प्रदिप मोहिते, संदिप ठोंबरे, शंकर जोशी आदी. मान्यवर उपस्थित होते. हि वार्षीक सभा संपन्न होण्यासाठी अनिल घाणेकर, वैभव बागवे, सुशिल फडकले, संजय आग्रे, सुलक्षणा भूवड, संतोष हुमणे, संजय खापले, सृष्टी रेवाळे , अश्विनी मास्कर यांनी व संपर्क प्रमूखांनी विशेष प्रयत्न केले. या संपूर्ण वार्षीक सभेचे सूत्रसंचालन करुन सर्वांचे आभार श्री. तुकाराम निवाते यांनी मानले या सभेला महिला - पुरुष सभासद तसेच संपर्क प्रमूख बहूसंख्येने उपस्थित होते

*हे दैनिक संस्थापक, संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र मांडवकर यांनी लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, बाजारपेठ, शृंगारतळी , ता. गुहागर, जि. रत्नागिरी. येथे प्रकाशित केले. उपसंपादक : दिनेश चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार प्रसिध्द होणाऱ्या बातम्या व संपादकीय याची पूर्ण जबाबदारी संपादक यांची राहील. तसेच अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत, असतीलच असे नाही. (न्यायालयीन वाद गुहागर कक्षेत ) कार्यालयीन पत्ता : लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, बाजारपेठ, शृंगारतळी, ता. गुहागर, जि. रत्नागिरी. पिन-४१५ ७२४कार्यालयीन संपर्क : हॉटस्ॲपः ७८८७९५२२०३, **Email:** dailyguhagarsatta*

# अनुसूचित जमातीचे व कोळी समाजाचे प्रश्न सोडवले जातील; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**जळगाव (प्रतिनिधी) :** अनुसूचित जमातीचे जे काही प्रश्न आहेत ते प्रश्न व कोळी समाजाचे प्रश्न सोडवले जातील . इकडे आपल्याला संपूर्ण समाजाला न्याय द्यायचा आहे. आम्ही पूर्णपणे तुमच्या पाठीशी आहोत.शेवटी हे सरकार तुमचं आहे, सगळ्यांचे आहे. सरकारच्या माध्यमातून सगळ्यांना न्याय देण्याचे काम करु,असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी दिले.





जलजीवन मिशनच्या २२कोटी रूपयांच्या पाणी पुरवठा योजनेच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री शिंदे हे जळगाव येथे आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी शिंदे यांनी वरील अभिवचन दिले.यावेळी व्यासपीठावर उद्योग मंत्री उदय सामंत, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी त्यांच्या भाषणातून जळगावच्या व त्यांच्या मतदार संघातील समस्या सोडविण्याची मागणी केली.यावेळी ना.पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की मी व लताताई सोनवणे यांनी आपल्याला निवेदन दिले आहे. जळगाव जिल्ह्यात कोळी समाज मोठ्या प्रमाणात राहतो. अनुसूचित जमातीच्या कोळी समाजातील १२००० कर्मचाऱ्यांचे पेन्शन बंद झाले आहे. ५८ वर्षापर्यंत नोकरी केली. अधिसंख्य पदाच्या माध्यमातून या कर्मचाऱ्यांची पेन्शन बंद केली आहे. कोळी समाजाच्या लोकांना न्याय द्यावा,अशी आग्रही मागणी ना.पाटील यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली.

अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र हे प्रांताकडून मिळाले पाहिजे. ज्यांच्या घरात वारसांना जातीचे प्रमाणपत्र आहे, त्यांच्या मुलांना जात प्रमाणपत्र मिळाले पाहिजे, असेही पाटील म्हणाले. ना.पाटील यांनी या आपल्या मागण्या व्यासपीठावरून मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मांडल्या. काही दिवसांपूर्वी २६ सप्टेंबर पासून सुरू होणाऱ्या आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन (ऑफ्रोह) संघटनेच्या जळगांव जिल्हा शाखेच्या वतीने ऑफ्रोह जळगाव चे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर ठाकूर, ॲड. गणेश सोनवणे यांनी राज्याचे पाणी पुरवठा व सार्वजनिक स्वच्छता मंत्री ना.गुलाबरावजी पाटील यांची भेट घेऊन सेवानिवृत्त कर्मचारी यांचा पेन्शनचा प्रश्न, अधिसंख्य कर्मचा-यांचे प्रश्न, जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देणे बाबत होत असलेला अन्यायाबाबत अन्यायग्रस्तांची व्यथा मांडून सविस्तर चर्चा करण्यात आली. अन्यायग्रस्तांच्या प्रश्नांची शासनस्तरावर सोडणूक करण्याचे आश्वासनही ऑफ्रोह च्या शिष्टमंडळाला दिले होते.

# तेली समाज बांधवांनी निर्माण केलेल्या श्री विश्वेश्वर सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई या संस्थेचा जिल्ह्यात विस्तार वाढविण्या संदर्भात चर्चा

**वरवेली गणेश किर्वे :** श्री विश्वेश्वर सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई या संस्थेचा कार्यक्षेत्र मुंबई बाहेर कोकण विभागात विस्तारीत झाले आहे.ही संस्था कोकणातील तेली समाज बांधवांनी उभी केली असुन जास्तीत जास्त तेली समाजातील तरुण,आर्थिक गरज असलेले समाज बांधव यांना सहकाराच्या नियमानुसार आर्थिक सहकार्य करते. त्यानिमित्ताने या संस्थेचे पदाधिकारी संस्थेची माहीती, नवीन सभासद नोंदणी, कर्ज सुविधा, भविष्यात तालुक्याच्या ठिकाणी शाखा निर्माण करणे इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी चिपळुण तालुका तेली समाज सेवा संघ अध्यक्ष आणि त्यांची सर्व टिम यांच्या सहकार्याने थरवळ रेसिडेंसी मु.पो. खेर्डी (वरची) तालुका चिपळुण, जिल्हा रत्नागिरी येथे रविवारी बैठक आयोजित करण्यात आली होती.



तरी या परिवर्तन घडवून आणणाऱ्या संस्थेची कार्यपद्धती समजून घेण्यासाठी तालुका मंडणगड, दापोली, खेडचे प्रतिनिधी स्वरुपात डाॅ.मोहन झगडे, चिपळुण तालुका अध्यक्ष श्रीकृष्ण (बापू) राऊत,गुहागर तालुका अध्यक्ष प्रकाश झगडे,संगमेश्वर तालुका अध्यक्ष संतोष पावसकर,राजापूर तालुका अध्यक्ष नरेश शेलार यांच्यासह अनेक पदाधिकारी,व समाज बंधुभगिनी उपस्थित होते.बैठकीला सुरुवात करताना मुंबईहून आलेले तेली समाज संस्था परेल व श्री.विश्वेश्वर सहकारी पतपेढीचे पदाधिकारी, रत्नागिरी जिल्हा तेली समाज सेवा संघाचे पदाधिकारी यांचे हस्ते दिपप्रज्वलन व महीला भगिनींच्या हस्ते संताजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन यथोचित स्वागत करण्यात आले.यावेळी प्रास्तविक करताना रघुविर शेलार यांनी सांगितले की आजच्या बैठकीचे आयोजन करण्यासाठी श्री.विश्वेश्वर पतपेढीच्या पदाधिकारी यांनी लेखी पत्र देऊन विनंती केली होती.त्याला अनुसरून रत्नागिरी तालुक्यात गेली २० वर्षापूर्वी स्थापन झालेली पतसंस्था असल्यामुळे व इतर तालुक्यात पतपेढी होणे आवश्यक असल्याने रत्नागिरी तालुका वगळून इतर तालुक्यातील समाज बंधुभगिनींची बैठक आयोजित केली आहे. आपण केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन बहुसंख्येने उपस्थित राहीलात त्याबद्दल प्रथम धन्यवाद दिले व सविस्तर विषय विषद केला व सर्वांनी कोणत्याही शंका कुशंका मनात न ठेवता चर्चा करण्याची विनंती केली.मुंबईहुन आलेले तेली समाज संस्थेचे पदाधिकारी श्री.जनार्दन गवाणकर,अध्यक्ष दिलीप केळंबेकर यांनी अतिशय मौलीक मार्गदर्शन केले.आणि या संधीचा सामाजिक स्तर उंचावण्यास कशी मदत होईल हे समजावून सांगितले.या चर्चेत भाग घेताना माजी सभापती विनोद झगडे, गणपतशेठ रहाटे,संतोष पावसकर, गोपाळ झगडे, मोहन झगडे, नरेश शेलार,गजानन महाडीक, संदीप रहाटे,विश्वनाथ रहाटे, गोवर्धन महाडीक,राम रहाटे, इत्यादींनी चर्चेत सकारात्मक भाग घेऊन पतपेढीच्या शाखा प्रत्येक तालुक्यात होणे गरजेचे कसे आहे हेच सांगितले. त्यासाठी प्रत्येक तालुक्यात कमीतकमी ३००० सभासद जास्तीत जास्त समाजातील व समाजा बाहेरील करतील त्याठिकाणी पहीली शाखेचा प्रस्ताव निर्माण करता येईल असे सांगितले.त्यामुळे कोणता तालुका पहीली बाजी मारेल अशी आनंददायी स्पर्धा निर्माण झाल्याचे चित्र पहायला मिळाले. या बैठकीला खास मुंबईहुन कीशोर रसाळ, लहू सकपाळ, संजय राऊत, प्रभाकर वाडेकर, योगेश राऊत, रत्नागिरीहुन विनायक राऊत, अनंत भडकमकर, राजापूरहुन वसंत सकपाळगुरुजी, संगमेश्वरहुन दिपक सकपाळ, जगन्नाथ राऊत, सदानंद रहाटे, संतोष रहाटे, प्रियंका भोपळकर, प्राजक्ता लिंबुकर, दिपिका किर्वे, गुहागरहुन दिव्या कीर्वे, अस्मिता झगडे, शशिकांत पवार, विश्वनाथ रहाटे, स्वप्निल झगडे, हरिश्चंद्र रहाटे, चिपळुणहुन श्रेया महाडीक, अनिल लांजेकर, राजेंद्र पवार, दिनेश लांजेकर, जगदीश राऊत, अशोक महाडीक, विनायक रहाटे, अमोल महाडीक, गणेश झगडे, विजय महाडीक, अमोल कील्लेकर, अभिजित महाडीक इत्यादी तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.ही बैठक चिपळुण तालुका अध्यक्ष बापू राऊत आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी अतिशय मेहनत घेऊन यशस्वी केली.

वृत्त १ वरुन...

# शृंगारतळी –गुहागर मार्गावर मोकाट गुरांचा रास्का रोको

गुरांच्या पायाचे खूर, किंवा इतर भागाला वाहनाच्या धडकेने जखमही झालेली दिसून येते. गुरांना वाचविण्यात नादात तात्काळ ब्रेक दाबल्याने कधी कधी वाहनेही आदळतात किंवा पडतात. शृंगारतळी आठवडा बाजारात तर मोकाट गुरांचा मोठा उपद्रव सुरु असतो. गुरे मालक आपल्या गुरांना घेऊन जात नाहीत. वास्तविक त्यांनी याची खबरदारी घेणे क्रमप्राप्त आहे. मात्र, तसे होत नसल्याने स्थानिक प्रशासनही फारसे कारवाई करताना दिसून येत नाहीत. दिवसेंदिवस हा मोकाट गुरांचा उपद्रव पाटपन्हाळे व शृंगारतळीवासियांसाठी डोकेदुखी बनलेला दिसून येत आहे. सध्या लम्पी स्कीन हा गुरांना बळावणारा रोग पसरु लागला आहे. राज्य व जिल्हा स्तरावरुन याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाकडून संबंधित ग्रामपंचायतींना गुरे मालकांनी गुरांची काळजी व योग्य ती खबरदारी घेण्याबाबत पत्रव्यवहार केलेले आहेत. अशावेळी मोकाट गुरांचा प्रश्न ग्रामपंचायतींसमोर उभा ठाकला आहे. ग्रामपंचायतींनी गुरे मालकांना नोटीसा देऊन मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्यास भाग पाडावे अन्यथा गुरे मालकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# डॉ. खंडू रघुनाथ माळवे-खरमा उर्फ डॉ खं र माळवे रयतेचा कैवारी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनीधी कवि सरकार इंगळी :** पुणे जिल्हा जुन्नर तालुक्यातील उदापूर गावचे सुपुत्र, साहित्यिक कवी डॉ. खंडू माळवे यांना दैनिक रयतेचा कैवारी जीवन गौरव पुरस्कार संपादक शाहू संबाजी भारती व विठ्ठल आंधळे यांचे हस्ते मिळाला याअगोदर गुरूब्रम्हा जीवन गौरव पुरस्कार हा सिंधुताई सकपाळ यांचे हस्ते मिळाला त्याचप्रमाणे सावली जीवन गौरव पुरस्कार भालचंद्र मुंगणेकर व संजय साळगावकर यांचे हस्ते मिळाला डॉ खंडू माळवे हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असल्याने थोडक्यात सामाजिक व शैक्षणिक कार्यात अग्रेसर आहेत नव्हे तर महाराष्ट्र राज्य पर्यटन व कला सांस्कृतिक महोत्सव समिती उपाध्यक्ष आहेत त्याच प्रमाणे मुंबई वृत्तपत्र लेखक संघ सल्लागार म्हणून कार्यरत आहेत त्यांचा महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य व संस्कृती मंडळाने काव्यसंग्रह चाळणीवाला 2013 मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे हस्ते प्रकाशित करण्यात आला. एकून पाच हजार कविता व हस्तलिखित लाखान केल्याने महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड, ओएमजी बुक ऑफ रेकॉर्ड, डायमंड बुक ऑफ



रेकॉर्ड, भारत बुक ऑफ रेकॉर्ड, नोंद आहे संतसाहित्य 500अभंग लिखित आहे तसेच चित्रपटात काम केलेले असे हे अष्टपैलू कलाकार असल्याने महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळ व चाहत्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आह

# पं.स.गुहागरचा नाविन्यपूर्ण उपक्रम

या ३गुंठ्याच्या प्लाॅटला ७५ टक्के सेंद्रिय व २५ टक्के रासायनिक खतांचा वापर केला आहे. आम्ही कृषी अधिकारी धायगुडे व कृषी विस्तार अधिकारी गजेंद्र पौनीकर यांच्या सुचनेनुसार सर्व उपाय योजना करीत असल्याचही त्यांनी सांगितले.. आमच्या डेमो प्लाॅट चा एक तरी गड्डा ४किलोपेक्षा अधिक उत्पादित करण्याचा आमचा मानस आहे,असे क्षितिज व श्वेता शिंदे यांनी सांगितले.

या प्रात्यक्षिक प्लॉटसाठी शेतकरी क्षितिज शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांनी खूप छान मेहनत घेतली आहे. याबद्दल गटविकास अधिकारी प्रशांत राऊत यांनी त्यांचे कौतुक केले. भेटीच्या वेळी कृषी अधिकारी धायगुडे व कृषी विस्तार अधिकारी गजेंद्र पौनीकर उपस्थित होते.



## वीज...

आषाढ श्रावण येता
सुसाट सुटतो वारा
ढग फुटी होई कधी
बरसती अखंड धारा

वीज खेळी लपंडाव
तुटतात कधी तारा
वीज आणा लवकरी
जन रेटा भारी तोरा

वायरमन प्रयास करे
जीवतया जरी प्यारा
जीवावर उदार होई
कर्मयोगी असे खरा

प्रकाश हवा अखंड
आमचा चाले जोरा
जीविताचा त्याचाही
जरातरी विचार करा

धन्यवाद कधी नाही
विसरे कसे उपकारा
कर्तव्य त्याचेच असे
करा शब्द भडिमारा

**हेमंत मुसरीफ**
पुणे, 9730306996.
www.kavyakusum.com

## अंकुर

माह्या लेकीचा लेकीचा
कसा संसार फुलला
तिच्या संसाराचा वेल
नभी मांडवात गेला !!

बहरला बहरला
फुले वेलीवर फुलं
मेघ,आभाळ मायेनं
पोटी बीज अंकुरलं !!

जीव फुटला मातीले
कसा कोंबा कोंबातून
केसर कस्तुरीचा गंध
येई रानावनातून !!

टंच भरलं कणीस
झोम्बे पानोपानी शेंग
रानी तरारल पिकं
आले नव्हतीच रंग !!

निघे बिजातून बीज
कैसी निसर्गाची माया
कधी माती होई पोट
कधी पोट होई काया !!

झाले घामाचे रे मोती
असं पिकलं रे रान
धान पेरलं मातीत
आलं मातीतून धन !!

**वासुदेव महादेवराव खोपडे**
सहा पोलीस उपनिरीक्षक(सेनी)
अकोला 9923488556,

# आदर्श शिक्षिका प्रांजली चव्हाण यांचा मजरेकौंढरतर्फे सत्कार

**मार्गताम्हाने/वार्ताहर :** सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील जि.प. आदर्श शिक्षिका पुरस्काराच्या मानकरी ठरलेल्या चिपळूण तालुक्यातील मजरेकौंढर प्राथमिक शाळेतील सौ. प्रांजली प्रशांत चव्हाण यांचा जि.प. आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल मजरेकौंढर ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी महिला ग्रामस्थांनी त्यांचे पेढे भरवून कौतुक केले.


सौ. प्रांजली चव्हाण यांचा सत्कार करताना ग्रामस्थ

यापूर्वी प्रांजली चव्हाण यांना आविष्कार फाऊंडेशनकृत राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षिका पुरस्काराने २०२२ व महाराष्ट्र शिक्षक पॅनेलतर्फे राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार प्राप्त झालेला आहे. शाळेमध्ये विविध उपक्रम राबवून शाळा व विद्यार्थी उत्तम घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा असल्याने त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले हदोते. याबद्दल मजरेकौंढर ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी गाव मंडळाचे अध्यक्ष विजय नवरत, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रुतिका नवरत, सर्व सदस्य, ग्रामपंचायत सदस्य सौ. रेश्मा नवरत, राकेश नवरत, सुशील गोरिवले, ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळ, पालक, विद्यार्थी सआदी उपस्थित होते.

# वेळणेश्वर येथे महिला राष्ट्रीय पोषण महिना अभियान जनजागृती

**वरवेली वार्ताहर :** गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर येथे राष्ट्रीय पोषण अभियान जनजागृती कार्यक्रम अंगणवाडी बाजारपेठ येथे घेण्यात आला.या कार्यक्रमाला सरपंच चैतन्य धोपावकर, संदीप गावणंग, ग्रामपंचायत सदस्य नितीन पोळेकर, शिक्षक प्रतिनिधी साळवी पत्रकार उमेश शिंदे, अंगणवाडी सेविका चेतना तांडेल, अर्चना भेकरे, आस्था ठाकूर, शामल शिंदे, अमृता पालशेतकर, चित्रा शिरगावकर, सर्व पालक वर्ग, सर्व किशोर वयीन मुली उपस्थित होत्या.



१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर हा महिला राष्ट्रीय पोषण महिना अभियान अंगणवाड्यांवर राबविले जात आहे. या अभियानामधुन मुलांना पुरक पोषण आहार देण्याबरोबरच पालकांमध्येही या आहाराबाबत जनजागृती करण्यात येत आहे. लहान मुलांना कुपोषणमुक्त, सुदृढ बनविण्यासाठी रोजच्या आहारात फळे आणि पालेभाज्यांचा समावेश असला पाहिजे. हा विचार सर्वांपर्यंत पोचवा म्हणून एक आगळेवेगळे अभियान वेळणेश्वर गावात अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांनी राबविले. येथील अंगणवाडी सेविका व आशा सेविका यांनी बेटी बचाव बेटी पढाव यासह पुरक पोषण आहारा संदर्भात घोषणा देण्यात आल्या.

अंगणवाड्यांमधील मुलांना फळे व पौष्टीक भाज्या मिळाव्यात याची माहिती देण्यात आली. यावेळी बोलताना सरपंच चैतन्य धोपावकर म्हणाले की,या राष्ट्रीय कार्यक्रमाच्या माध्यमातून लहान बालकांचे पालक, किशोर वयीन मुली यांना मार्गदर्शन मिळावे हाच उद्देश आहे, प्रगत असलेल्या अमेरिका देशातील तेथील संस्थांनी या पोषण आहार कार्यक्रमाची निर्मिती केली, त्यानंतर त्याची प्रचिती सर्वच देशांमध्ये व्हायला लागली, याची दखल भारत देशाने घेतल्यानंतर महिला व बाल कल्याण विभागाने ही योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला. कुपोषित लहान बालके, किशोर वयीन मुली, गर्भवती महिला यांचे आरोग्य चांगले व्हावे, यासाठी हे अभियान राबविले जात आहे.या कार्यक्रमासाठी सर्व अंगणवाडी सेविका, आशा सेविका, सर्व पालक यांनी योगदान दिले.

# आरजीपीपीएल येथील बाल भारती पब्लिक स्कूलचा विद्यार्थी पदभार समारंभ संपन्न

**वरवेली गणेश किर्वे :** गुहागर तालुक्यातील अंजनवेल येथील आरजीपीपीएल कंपनीतील बाल भारती पब्लिक स्कूलच्या वतीने मैत्री क्लब आरजीपीएल येथे सकाळी प्रशालेचे मुख्याध्यापक सुरजीत चटर्जी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी पदभार समारंभ पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी असीमकुमार सामंता , सी.ई.ओ. आरजीपीपीएल रत्नागिरी, महमेद हक सर, जीएम ,ओ अड एम, केकेएल, श्री.एस.पी. रेड्डी, हेड एचआर, केकेएल, डॉ.जॉन फिलीप एम, हेड एचआर, आरजीपीपीएल, आणि श्रीम. लता जॉन त्याचबरोबर गुहागर तहसिलदार श्रीम. प्रतिभा वराळे, श्रीम. अनुरूपा चटर्जी, आदरणीय पालक यांची उपस्थिती लाभली.




त्यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक सुरजीत चटर्जी यांनी उपस्थित पाहुण्यांचे फुलांचे रोपटे देऊन स्वागत केले.आपल्या भाषणातून त्यांनी प्रमुख अतिथींचे आभार मानलेच व विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या जबाबदारीबद्दल संबोधित केले. विद्यालयाचा मुख्य विद्यार्थी म्हणून कु. जयवर्धन जाधव आणि विद्यार्थिनी कु. संस्कृती हळये यांची निवड करण्यात आली. त्याचबरोबर विद्यालयाच्या वशिष्ठी हाऊसचे कप्तान कु.आदित्य बनिश व कु.श्रावणी बागकर, उपकप्तान कु. तनिष देवाले व कु. आर्या कामेरकर, सावित्री हाऊसचे कप्तान कु.केतन आंग्रे व कु. श्रावणी शेटे, उपकप्तान कु. मारुफ बांगी व कु.रुई वळंजू, गोदावरी हाऊसचे कप्तान कु.आर्य मोरे व कु.प्रिया वैष्णव, उपकप्तान कु.नील एम एस व कु.राही शिंदे,कृष्णा हाऊसचे कप्तान कु.विश्व भोसले व कु.तन्वी पारखे, उपकप्तान कु. आर्यन चव्हाण व कु.तनया खानविलकर, तसेच कल्चर सेक्रेटरी कु. अथर्व देसाई व कु.अपूर्वा खोत ,स्पोर्ट कप्तान कु.हर्षलकुमार भाले व कु. ख़ुशी वेल्हाळ यांची निवड केल्यानंतर इयत्ता दुसरीच्या वर्गातून उत्तम विद्यार्थी कु. ओम शेटे आणि विद्यार्थिनी मेध मिश्रा व तिसरीच्या वर्गातून उत्तम विद्यार्थी कु.निवेद गावडे आणि विद्यार्थिनी कु. शाल्मली काले, चौथीच्या वर्गातून उत्तम विद्यार्थी कु. अर्णव साबळे आणि विद्यार्थिनी कु.इशान्वी पांड्ये, पाचवीच्या वर्गातून उत्तम विद्यार्थी कु.नैतिक कुमार आणि विद्यार्थिनी कु. विदिता पांड्ये, सहावीच्या वर्गातून उत्तम विद्यार्थी कु. मेधांश चटर्जी आणि विद्यार्थिनी कु.मालविका एम एस, सातवीच्या वर्गातून उत्तम विद्यार्थी कु. सक्षम लखनपाल आणि विद्यार्थिनी कु. काव्या सोनी, आठवीच्या वर्गातून उत्तम विद्यार्थी कु. अर्णव साबळे आणि विद्यार्थिनी कु. माही शाह, नववीच्या वर्गातून उत्तम विद्यार्थी कु. निलय फुलझेले आणि विद्यार्थिनी कु.अस्मी धानुरकर, दहावीच्या वर्गातून उत्तम विद्यार्थी कु. संस्कार बागकर आणि विद्यार्थिनी कु. वैदेही सैतवडेकर यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमा अंती श्रीम.प्रतिभाजी वराळे, तहसिलदार यांनी त्यांच्या मनोगतातून विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासाचे महत्त्व सांगितले. तसेच शाळा विविध उपक्रम राबवत आहे यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास गतीने होतो. प्रत्येक मुलाने आपले ध्येय निश्चित करून सचोटी, कठोर परिश्रम आणि शिस्तीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. महमेद हक सर, जीएम,ओ अड एम, केकेएल, यांनी विद्यार्थी पदभार समारंभाच्या उत्तम व्यवस्थेचे कौतुक केले आणि सर्व पदभार स्वीकारलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे आणि जबाबदारीच्या भावनेने पार पाडल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्याची आठवण करून दिली. असीमकुमार सामंता सर, सी.ई.ओ. आरजीपीपीएल रत्नागिरी, त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना नेतृत्वाची प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. सुरजीत चटर्जीसर यांनी सर्वांचे आभार मानले. विद्यार्थ्यांनी सर्वां समवेत शपथ ग्रहण केली.

# राजापूर मिठगवाणे येथे शिवणकाम प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ...

**प्रमोद तरळ :** राजापूर - श्रीदेव अंजनेळश्वर देवस्थान, मिठगवाणे व वात्सल्य ट्रस्ट, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अंजनेश्वर भक्तनिवासा मध्यें "शिवणकाम प्रशिक्षण", वर्ग सुरू करण्यात येत आहेत सदर शिवणकाम प्रशिक्षणाच्या पहिल्या वर्गाचा शुभारंभ सोहळा मंगळवार दि. २७ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता श्रीदेव अंजनेश्वर मंदिर मिठगवाणे भक्तनिवास येथे होणार सदर या नविन उपक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

ज्या व्यक्तिंना या प्रशिक्षण वर्गात प्रवेश घ्यायचा असेल त्यांनी डॉ मिलिंद देसाई - ९८२३२७७३२६, डॉ प्रदिप मयेकर - ९२८४१६००७८, दिवाकर आडविरकर - ९३७०४२८२७५, उमर नाईक - ७०३८७६२९७५, सत्यवान कणेरी - ९२७२०४१२०३, मनोहर धुरी - ९२८४९६५९४९ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा

# परतीचा पाऊस निघाला आपल्या गावाकडे शेतपिके लागली डोलू, नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

**गुहागर/प्रतिनिधी :** उत्तरा नक्षत्र संपून हस्ताची वाटचाल सुरु झालेली असतानाच आता पावसाने आपला मुक्काम संपवून तो परतीला लागलेला दिसून येत आहे. गेले तीन दिवस तुरळक सरी सोडल्या तर पाऊस जवळ जवळ गायबच झालेला आहे. शेतपिकेही फळाला आलेली असून ती डोलताना दिसत आहेत. त्यातच नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी ठिकठिकाणी सुरु असल्याचे पहायला मिळत आहे.

यावर्षी मोसमी पावसाने दमदार सुरु केली. सर्व नक्षत्रे भरुन काढली. मधल्या कालावधीत थोडीफार उसंत घेतली असली तरी कोरडे राहिलेले दिवसही भरुन काढले. सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात पावसाने चांगलीच सलामी दिली. त्यामुळे शेतीच्या वाढीला चालना मिळाली. सध्या भातशेतीच्या लोंब्या फुटलेल्या दिसून येत असून काही दिवसांतच पूर्णतः पिके तयार होणार आहेत. माळरानेही विविध रंगीबेरंगी फुलांनी बहरलेली दिसून येत आहेत. सर्वत्र सृष्टीमध्ये एकप्रकारचा आनंदोत्सव सुरु असून परतीच्या पावसानेही आपला प्रवास सुरु केलेला आहे.

सध्या पितृपंधरवडा सुरु असून पितरांना तृप्त करणारी क्रियाकर्मे जोरात सुरु आहेत. नवमी, भरणी श्राध्द यांची रेलचेल पहायला मिळत आहे. नवरात्रोत्सवासाठी बाजारपेठाही सजलेल्या आहेत. विविध रंगी दांडिया खेळल्या जाणाऱ्या टिपऱ्या, त्यावरील मँचींग कपडे खरेदीसाठी बाजारपेठेतील दुकानांमधून पहायला मिळत आहेत. नवरात्रोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांकडून उत्सवाची जोरदार तयारी सुरु झालेली आहे. एकूणच परतीचा पाऊस आणि जवळच येऊन ठेपलेला शारदेचा उत्सव यामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण झालेले पहायला मिळत आहे.



# मी गुरुजी बोलतोय

*सर्वप्रथम कुणबी राजकीय संघटन समितीसह सर्व कुणबी बांधवाना मनापासून शुभेच्छा !*

*खरे तर राजकारण हा माझा विषय नाही. परंतु याचा अर्थ असाही कुणी करु नये की, राजकारण मला माहितच नाही. आपला देश सर्वप्रथम कृषिप्रधान देश आहे. म्हणजेच आपल्या कुणब्यांचाच देश आहे! आणि याचा मला सार्थ अभिमान आहे.*

*अनेक वर्षे या देशाचे आपण मतदार असुनही आणि आपल्या मातृसंस्थेने शतक पार केल्यानंतर, अनुभवानुसार आज आपल्याला वाटतंय की, आपलं राजकीय संघटन असावं, यापूर्वीही तसा प्रयत्न समाजाच्या वतीने आपण केलेला आहे. त्यावेळी का आपण अपयशी ठरलो, याचेही आत्मपरीक्षण व्हायला हवे. त्याचबरोबर मुळात राजकारण विषयाचा सखोल अभ्यास आपण करायला हवा. तो कसा करावा याबाबत केवळ समितीतज्ञ किंवा पदाधिकारी वर्गानेच नव्हे तर, ग्रामीण भागातील आणि मुंबईतील मातब्बरांनी विचार करायला हवा.*

*भारत किंवा भारतीय गणराज्य हा दक्षिण आशियामधील एक प्रमुख देश आणि जगातील प्राचीन संस्कृतीपैकी एक आहे. हा देश क्षेत्रफळाने जगातील ७ वा सर्वात मोठा देश आहे, तर लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारताला हजारो वर्षे जुना इतिहास आहे, अनेक साम्राज्ये या भूमीत विकसित पावली व लयाला गेली. भाषा, ज्ञान, अध्यात्म, कला, धर्म या बाबतीत जगाला या देशाने मोठा वारसा दिला आहे. उष्ण कटिबंधातील ह्या देशात विविध प्रकारचे हवामान अनुभवायास मिळते. अनेक भाषा, अनेक प्रांत, अनेक रितीरिवाज आहे परंतु या विविधतेत एकता हे या देशाचे वैशिष्ट्य आहे. कृषिप्रधान भारताला प्राचीन धार्मिक व सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. जगाच्या इतिहासामध्ये आपल्या संस्कृतीला मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे. असे असताना आपण स्वतःचा राजकीय झेंडा घेऊन या राजकारणात सक्रिय सहभाग करायलाच हवा !*

*(क्रमशः.....)*

**शाहीर वसंत भातडे**
मो. ९९६७९८३३०२